# छोट्या मावळ्याचे राजांच्या रयतेस पत्र

ज्यांनी पहिल्यांदा रयतेला स्वराज्याचं स्वप्न दाखवलं आणि ते सत्यात उतरवलं,
ज्यांनी पारतंत्र्याच्या काळोखात स्वातंत्र्याची मशाल पेटवून आपल्या रयतेला दिशा दाखवली,
अशा आपल्या **राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती** आपण १९ फेब्रुवारीला साजरी करीत आहोत.
जयंतीनिमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू जाणून घेऊयात.
**इतिहासातील कदाचित असा एकमेव राजा होऊन गेला जो फक्त कोणा एक राज्याचा राजा नव्हता तर सर्वसामान्य रयतेचा राजा होता.**

रयतेला लुटणाऱ्या वतनदारांना त्यांनी वठणीवर आणले. शेतकऱ्यांची वतनदारांकडून होणारी पिळवणूक तर राजांनी थांबवलीच शिवाय **रयतेच्या भाजीच्या देठालाही धक्का लागणार नाही अशी काळजी** घेण्याची सक्त ताकीद त्यांनी आपल्या सैनिकांना दिली.
गरीब शेतकऱ्यांना पडीक जमिनी दिल्या, शेत दिले ,बैल, औतकाठी दिली, बिनव्याजी कर्ज दिले. अशाप्रकारे **रयतेच्या पोशिंद्याची काळजी घेणारा एकमेव राजा राजा शिवछत्रपती** होते.

**महाराजांनी मुली-महिलांचा सन्मान केला.** महिलांना त्रास देणाऱ्या लोकांना अद्दल घडवली. त्यामुळे स्वराज्यात स्त्रियांना आत्मसन्मानाने जगता आले.

सैन्यात भरती करताना महाराजांनी कोणाचीही जातपात पाहिली नाही. शिवरायांचे मावळे सर्व जाती धर्मांचे होते. ज्याला त्याला आपल्या धर्माचे पालन करण्याचा पूर्ण अधिकार आहे.
**धर्मावरून कधीही बखेडा म्हणजेच वाद न घालण्याची आज्ञा** महाराजांनी दिली होती.

ज्या अमावस्येला आपण अपशकुनी दिवस मानतो त्याच अमावस्येला महाराजांनी अनेक महत्वाच्या मोहिमा राबवून त्या यशस्वीपणे फत्तेही केल्या. म्हणजेच महाराज कधीही **अंधश्रद्धा बाळगत नव्हते.**
भारतात सर्वप्रथम समुद्री युद्ध व सागरी आरमाराची उभारणी महाराजांनी केली.
म्हणूनच त्यांना **फादर ऑफ इंडियन नेव्ही** असे म्हणतात.

अशा या सर्वकालीन द्रष्ट्या, कुशल आणि रयतेच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या महाराजांकडूनच प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात फुले-शाहू-आंबेडकर विचारधारा जन्माला आली.
आज आपल्या जीवनात जी काही सुबत्ता, आनंद व समाधान आहे ती याच विचारधारेचा परिपाक आहे.
चला तर मग आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने अशा या लोककल्याणकारी राजांना नमन करूयात.
तुम्ही माझ्यासोबत म्हणा,
**तुमचं आमचं नातं काय, जय जिजाऊ, जय शिवराय**